पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक ३८**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **सोमवार दि. १७/१२/२०१८** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र. १८२०**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र. ४ चा दि. १/११/२०१८ ते दि.३०/११/२०१८ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र. ४ यांचे जा.क्र. समआ-४/३९३१ दि.१०/१२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १८२१**

पुणे महानगरपालिका क्षेत्रिय आयुक्त, परिमंडळ क्र. २ कार्यालय अधिनिस्त क्षेत्रिय कार्यालयांच्या माहे नोव्हेंबर २०१८ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/क्षेआप२/८१३ दि.१२/१२/२०१८ चे पत्र.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. १८२२**

मा.आबा बागुल यांचे दि. ७/१२/२०१८ चे पत्र.

केंद्र शासनाकडून सातवा वेतन आयोग मंजूर झालेला असून राज्य सरकारने कर्मचा-यांसाठी १ जानेवारी २०१९ पासून सातवा वेतन आयोग लागू केला आहे. पुणे महानगरपालिकेच्या सेवकांना देखील १ जानेवारी २०१९ पासूनच सातवा वेतन आयोग चालू करण्यात यावा. सदर प्रकरणी अंदाजपत्रकात तरतूद देखील उपलब्ध आहे. सातवा वेतन आयोग लागू करणेसाठी वेतन आयोग समिती तात्काळ गठित करण्यात यावी. पुणे महानगरपालिकेतील सर्व कर्मचा-यांना सातवा वेतन आयोग देण्याची कार्यवाही तातडीने करण्यात यावी.

**विषय क्र. १८२३**

मा.सौ.अश्विनी कदम यांचे दि. ११/१२/२०१८ चे पत्र.

यंदाच्या वर्षी संपूर्ण महाराष्ट्रात पाऊस कमी पडल्यामुळे दुष्काळाची स्थिती निमार्ण झालेली आहे. शासनाने सुध्दा दुष्काळ जाहिर केलेला आहे. अश्या परिस्थिती पुणे शहरावर सुध्दा पाणी कपातीचे संकट आलेले आहे. पुणे शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या चारही धरणांमध्ये पाणीसाठा कमी झालेला आहे. पुढील पावसाळ्यापर्यंत पाणी काटकसरीने व काटेकोरपणे वापरावे लागणार आहे. येणाऱ्या उन्हाळ्यापर्यंत भिषण परिस्थिती निर्माण होऊ शकते.

त्यासाठी आत्ताच पुणे महानगरपालिकेने पाऊले उचलून पुणे शहरात होत असलेली काँक्रिट रस्त्यांची कामे व गल्लीबोळ काँक्रिटीकरण करणे किंवा तत्सम कामे ज्याला पाणी मुबलक लागते अशा कामांना बंदी घालावी व दुष्काळ्याचा परिस्थितीस सामोरे जाण्यासाठी योग्यती तयारी करावी.

**विषय क्र. १८२४**

मा.सौ.अर्चना पाटील यांचे दि. ११/१२/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. १९ क मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.२५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, बजेट हेड सीई२२अे७०४/एसजे२०-१७८, प्रभाग क्र.१९ क मधील हरकानगर येथे समाजमंदिर बांधणे | २५ लाख | --- |

| नवीन सुचविलेली कामे – | | |
|---|---|---|
| १) प्रभाग क्र. १९ क मधील काशेवाडी परिसरातील समाज मंदिर दुरुस्ती व रंगरंगोटी करणे | --- | २० लाख |
| २) प्रभाग क्र. १९ क मधील विविध ठिकाणचा राडारोडा उचलणे | --- | ३ लाख |
| ३) प्रभाग क्र. १९ क मध्ये चेंबर मधील गाळ काढणे व चेंबर दुरुस्ती करणे | --- | २ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. १८२५**

मा. डॉ. सिध्दार्थ धेंडे, उपमहापौर, पुणे व मा. सौ. सोनाली लांडगे यांचे दि. १२/१२/२०१८ चे पत्र.

पुणे शहरातील मोठ्या मृत प्राण्यासाठी कार्यन्वित होणाऱ्या इन्सिनिरेटर प्लॉट मध्ये चिकन वेस्ट, मटण वेस्ट व पोर्क वेस्ट यांची नाममात्र दराने विल्हेवाट लावण्याची व्यवस्था करण्यात यावी.

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. १८२६**

उप आयुक्त, (परिमंडळ विभाग क्र.१) पुणे महानगरपालिका यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.१६ नोव्हेंबर २०१८ ते ३० नोव्हेंबर २०१८ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परिमंडळ–१/८०० दि.११/१२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १८२७**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील दि. १६/११/२०१८ ते दि.३०/११/२०१८ पर्यंतची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेल्या कामाची माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परिमंडळ–४/८०१ दि.११/१२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १८२८**

दि. १९/११/२०१८ ते दि. २५/११/२०१८ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ३८ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/अग्निशमन/८०९ दि.१२/१२/२०१८ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्र. १८२९**

दि. १२/११/२०१८ ते दि. १८/११/२०१८ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ५४ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/अग्निशमन/८१० दि.१२/१२/२०१८ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्र. १८३०**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ कार्यालयाचे नियंत्रणाखालील क्षेत्रिय कार्यालयांकडील महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार सन २०१८–१९ मधील मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेल्या कामाची मासिक यादी माहे ऑक्टोंबर २०१८ निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/प.क्र.३/८११ दि.१२/१२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १८३१**

परिमंडळ क्र. २ कार्यालय अधिनिस्त औंध–बाणेर शिवाजीनगर–घोलेरोड व कोथरुड–बावधन क्षेत्रिय कार्यालयांकडील दि.१/११/२०१८ ते दि.३०/११/२०१८ अखेर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेल्या कामाची माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/क्षेआप२/८१२ दि.१२/१२/२०१८ चे पत्र.

## हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्र. १८३२**

कर आकारणी व कर संकलन खात्याकडील पेठ शिवाजीनगर सन २०१०-११ मधील आकारणी प्रकरणांची व तदनुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/२१७६ दि. १०/१२/२०१८ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. १८ सन २०१८-२०१९ चा विचारासाठी.

## ठरावान्वये आलेले अभिप्राय

**विषय क्र. १८३३**

पुणे महानगरपालिकेकडून जाहिरात फलक परवानगी व नूतनीकरण दिलेल्या सर्व जाहिरात फलक धारकांकडून परवानगीच्या दिनांकापासून ते आजपर्यंत व्यावसायिक दराने कर आकारणी करण्याबाबत मा.सौ.चाँदबी नदाफ, मा.सौ.राजश्री काळे व मा.सौ.वैशाली मराठे यांचे दि.१६/८/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ९६१ दि. २८/८/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/७८६ दि.६/१२/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

## सर्वात कमी रक्कमेची टेंडर्स

**विषय क्र. १८३४**

वडगाव नवले पुल ते कात्रज चौक व कात्रज चौक ते कात्रज घाट दरम्यान महापालिका हाद्दीतील मार्गांचे मजबुतीकरण व पुर्णडांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस.एस.साठे यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ५३,३२,०५७/- पेक्षा १५.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४४,७९,४६१=०८ पैकी उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ६,३९,८४६=८४ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये २८,०३६/- पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटी शर्तीनुसार डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/८०६ दि.११/१२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. १८३५**

प्रभाग क्र. १ क (कळस-धानोरी) स.नं. २१ धानोरी येथील उद्यान आरक्षणाच्या जागेतील उद्यानाची उर्वरित कामे पुर्ण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.हेरंब एंटरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८४,८०,४१२=०४ पेक्षा ४% कमी) (सुधारित) असल्याने त्यांचेकडून त्यांचे सुधारित टेंडर दराने र.रु. ८१,४१,१९५=५५ पर्यंत काम करून घेणेस व त्यानुसारचा जी.एस.टी. र.रुपये ९,७६,९४३=४७ अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये २,३८,८६४=६० अधिक टेस्टिंग चार्जेस र.रुपये १०,६०६/- अदा करणे करिता तसेच भाववाढ सुत्रानुसार (टेंडर अटी शर्तीनुसार) दरात होणारी वाढ/घट त्यानुसार येणारी रक्कम ठेकेदारास आदा/वसूल करणेस यांस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/उद्यान/८०८ दि. ११/१२/२०१८ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. १८३६**

मा.हिमाली कांबळे व मा.उमेश गायकवाड यांचे दि. २७/११/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.२१ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु. ३६,५०,०००/- लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक, पान क्र. २१८, अ.क्र.४, CE20C541, हडपसर शुटिंग रेंज येथे प्रकाश व्यवस्था करणे. | ३६,५०,०००/- | --- |
| <u>नविन सुचविलेली कामे</u> | | |
| १) प्रभाग क्र.२१ अ मध्ये विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे. | --- | १०,००,०००/- |
| २) प्रभाग क्र.२१ अ मध्ये विविध ठिकाणी विद्युत विषयी तद्नुंषीक कामे करणे. | --- | १०,००,०००/- |
| ३) प्रभाग क्र.२१ अ मधील विविध ठिकाणी पोल व दिवे बसविणे. | --- | १०,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ४) प्रभाग क्र.२१ अ मध्ये हायमास दिवे बसविणे. | --- | ६,५०,०००/- |

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि.०४/१२/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १८३७**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.प्रमोद ओसवाल व मा.सौ.चाँदबी नदाफ यांचे दि.१३/३/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २३९९ दि. २०/३/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६३ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.११/१२/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १८३८**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.बाळा ओसवाल व मा.योगेश ससाणे यांचे दि.२७/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १४२३ दि. २८/११/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६४ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.११/१२/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १८३९**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.अविनाश बागवे व मा.मुकारी अलगुडे यांचे दि.१५/९/२०१५ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ११४७ दि. १५/९/२०१५ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६५ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.११/१२/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १८४०**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.योगेश ससाणे व मा.बाळा ओसवाल यांचे दि.१४/२/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २१९३ दि. २०/२/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६६ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.११/१२/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १८४१**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.अविनाश बागवे, मा.सौ.वैशाली मराठे, मा.अभिजित कदम, मा.सौ.सुनिता गलांडे यांचे दि. १२/३/२०१३ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २६५४ दि. १९/३/२०१३ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६७ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.११/१२/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १८४२**

इमारतीचे साईड फ्रंट मार्जिन जाहिरात फलकांबाबत मा.अविनाश बागवे व मा.प्रिया गदादे यांचे दि.१३/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १३१३ दि. २१/११/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६८ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला फेरअभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.११/१२/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १८४३**

पुणे महानगरपालिका हद्दीत क्रीडा क्षेत्रास अधिक गतीने चालना मिळणेकरीता व पुणे शहराचा क्रीडा क्षेत्रात नावलौकिक होण्याच्या दृष्टीने मा.अति.महा.आयुक्त(वि) यांच्या विषयपत्रासोबत जोडलेल्या पुणे महानगरपालिका सुधारित क्रीडा धोरण २०१८ (मसुदा) यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) जा.क्र. मआ/क्रीडा/३८१, दि. ०९/०८/२०१८ चे पत्रावर झालेला क्रिडा समिती ठराव क्र. २३ दि.१६/१०/२०१८ विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.११/१२/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १८४४**

अलंकार थिएटरजवळ रेल्वे ओव्हरब्रिज बांधणे या कामास सन २०१८-१९ साठी उपलब्ध अंदाजपत्रकीय तरतूद अपुरी असल्याने वर्गीकरणाद्वारे या कामासाठी र.रुपये ४६० लक्ष इतकी आर्थिक तरतूद उपलब्ध करून देणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्र)/७७८ दि.४/१२/२०१८ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक, मुख्य अभियंता (प्रकल्प), शहरातील नदी सुधारणा कामे करणे, तद्नुषंगिक कामे करणे.(CE20D219/L2-) मधील अ.क्र.३ नदी सुधारणा प्रकल्प राबविणे (PPP/कर्ज/अनुदान/इतर वित्तीय माध्यमातून नदी व नदीकाठ विकसित करणे/सुधारणा करणे) | ४,६०,००,००० | ---- |
| सुचविलेले काम<br>मुख्य अभियंता (प्रकल्प), शहरातील विविध ठिकाणी पूल बांधणे, उड्डाणपूल बांधणे, भुयारी मार्ग करणे या कामाअंतर्गत बजेट हेड (CE20D170/L1-) मधील अ.क्र.५ अलंकार थिएटर जवळ रेल्वे ओव्हरब्रीज बांधणे | ---- | ४,६०,००,००० |

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.११/१२/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**संकिर्ण**

**विषय क्र. १८४५**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १५२ मध्ये वसूल न होण्याजोगा कर निर्लेखित करणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/टीजीओ/७९७ दि.७/१२/२०१८ चे पत्र.

१. कर आकारणी व करसंकलन कार्यालयाकडून यापुर्वी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १५२ प्रमाणे वसुल न होण्याजोगा कर निर्लेखित करणेबाबत तयार करण्यात आलेली निवासी कराची १५ प्रकरणे व त्यांची माहे मार्च २०१८ अखेरची थकबाकी व २०१८-१९ ची मागणी अशी एकूण रक्कम रुपये२४,९९,८१६/- निर्लेखित करणेबाबत कागदपत्राची तपासणी करण्यात आली असून मिळकतकर रक्कम निर्लेखित करणे बाबत कार्यवाही करणेस.
२. सदरची निवासी कराची १५ प्रकरणे निर्लेखित केल्यानंतर नव्याने निर्लेखित करावयाच्या प्रकरणांची कागदपत्र तपासून, जागा तपासणी करुन प्रशासकीय मान्यता घेऊन पुढील प्रशासकीय कार्यवाही पुर्ण करुन त्याचा अहवाल मा.स्थायी समितीस मान्यतेसाठी सादर करणेस.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**